|| सा विद्या या विमुक्तये ||

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)

Phone: (02462) 229325 | Website: www.srtmun.ac.in | E-mail: srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२०-२१/८४ दि.२५/०७/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत उन्हाळी-२०२१ परीक्षा आता ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व क्लस्टर उन्हाळी २०२१ या परीक्षा कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे पूर्वी फक्त ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे ठरले होते. पण आता या सर्वच परीक्षा ऑनलाईनसह ऑफलाईन पद्धतीनेही घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, कार्यक्षेत्रातील चारही जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मान्यतेने या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी दि.२८ जुलै, पर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन चे संमतीपत्र महाविद्यालयात सादर करावेत. विद्यार्थ्यांना दोन्ही पैकी एकच पर्याय निवडता येईल. ऑफलाईन पद्धतीने परीक्षा केंद्रावर परीक्षा घेताना कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र, राज्य, जिल्हा व्यवस्थापन, प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करण्यात येईल.

बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी व इतर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष वगळून क्लस्टर पद्धतीच्या परीक्षा पूर्वी दि. २६ जुलै, ते १० ऑगस्ट, दरम्यान होणार होत्या. त्या आता सुधारित वेळापत्रकानुसार दि.१७ ते २७ ऑगस्ट, दरम्यान होणार आहेत. पदवी अंतिम वर्षाच्या परीक्षा पूर्व नियोजित वेळापत्रकानुसार दि.५ ऑगस्टपासून सुरू होतील. पदव्युत्तर व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा या दि.११ ऑगस्ट, पासून घेण्यात येतील. यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष वगळून इतर वर्षाच्या क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणाऱ्या तारखेत बदल झालेला नाही. त्या पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच दि. २ ते १० ऑगस्ट, दरम्यान होतील. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष वगळून इतर वर्षाच्या क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षा दि.५ ते १४ ऑगस्ट दरम्यान ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. विद्यापीठातील सर्व संकुले व उपकेंद्रातील अभ्यासक्रमाच्या परीक्षेत कोणताही बदल झालेला नाही. त्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच घेण्यात येतील.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार क्लस्टर पद्धतीने पदवी स्तरावरील प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांच्या वेळापत्रकात बदल झालेला आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र दि.३१ जुलैपर्यंत विलंब शुल्कासह स्वीकारण्यात येतील. पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ज्या परीक्षा दि.११ ऑगस्ट पासून सुरू होणार आहेत. त्या परीक्षांचे आवेदनपत्र विलंब शुल्कासह दि.२८ जुलै, पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र-संचालक डॉ. रवि सरोदे यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,
सप्रेम नमस्कार,
मान्यवर/ महोदय,
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.
आपला विश्वासू,
जनसंपर्क अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.